
"If you take away our jobs, you will kill us faster than the HIV virus...
We can work. We pose no risk to our co-workers.
Work is more than medicine to us.
It keeps us going and enables us to bring home food and medicine."
Jahnabi Goswami
Living with HIV
INDIAN NETWORK FOR PEOPLE LIVING WITH HIV/AIDS
ILO
Prevention of HIV/AIDS in the World of Work: A Tripartite Response
– An ILO India Project supported by U. S. Department of Labor
International Labour Office, New Delhi
Translated and Reprinted by

3

# परिणाम आणि राज्यकारभार







विवेकानंदन

समाजाचं भविष्य व अर्थकारण एच्.आय्.व्ही./एड्स च्या साथीमुळे धोक्यात आलेलं आहे. युएनडिपीच्या ने प्रकाशित केलेल्या २००५ सालीच्या मानवविकास अहवालानुसार एच्.आय्.व्ही./एड्स हे मानवी इतिहासातील विकासाला असलेलं सगळ्यात मोठं संकट आहे. १९९० ते २००३ या काळांत जगातील अनेक देश एच्.आय्.व्ही./एड्स च्या संसर्गामुळे मानवविकासाच्या सुचित जागतीक क्रमावारीवर खाली घसरले. दक्षिण आफ्रिका ३५ क्रमांनी, झिंबाब्वे २३ क्रमांनी, बोटस्वाना २१ क्रमांनी, स्वॅझीलॅंड २० क्रमांनी, केनिया १८ क्रमांनी, झांबिया १६ तर लेसोथो १५ क्रमांनी.

एच्.आय्.व्ही./एड्स हा विकासाच्या प्रगतीला बऱ्याच प्रकारे खीळ घालु शकतो. ज्यामध्ये आयुष्यमानापासून औद्यागीक उत्पादनांपासून अनेक गोष्टींचा अंतर्भाव होतो. या साथीचा असलेला परिणाम लक्षात घेऊनच तो रोखण्याचा गंभीर प्रयत्न होणं गरजेचं आहे.

## लोकसंख्येची रचना

हा संसर्ग पसरण्यापूर्वी सरासरी आयुष्यमान वाढवण्याचे जे प्रयत्न यशस्वी होत होते, त्यांना खीळ बसली आहे. बोट्स्वानामध्ये उत्पादन करु शकणारी पिढी राहील की नाही असा प्रश्न उभा रहातोय. २०-४९ या वयोगटातील व्यक्तींचे मोठ्या प्रमाणातील मृत्यू हे या पुर्वीचे वयोगटाप्रमाणे मृत्युंचे आराखडे पूर्णपणे मोडीत काढत आहेत. १९८५ ते १९९० या

**ज्यांना औषधोपचार शक्य आहे त्यांच्या दृष्टीने एड्स हा मृत्यूदंड नव्हे. या रोगावर योग्य उपचार व्हावे म्हणून सर्वसमावेशक धोका आखण्याची जबाबदारी राजकाऱ्यांची आहे.**

**– बिल क्लिंटन**

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष

## कामाच्या ठिकाणी कृती कार्यक्रम

सिंगारेणी खाणी या आंध्रप्रदेशमधील एक प्रमुख रोजगार पुरवणारं केंद्र आहे. आंध्रप्रदेश हे भारतातील सर्वाधिक एच्.आय्.व्ही. संसर्ग असलेल्या राज्यांपैकी एक आहे. या खाणींमध्ये ९३,००० लोकांना रोजगार मिळतो व भारतातील १०% कोळसा या खाणीतुन पुरवला जातो. खाणीच्या व्यवस्थापनाने एच्.आय्.व्ही. संदर्भात अभ्यास केला व त्यांना लक्षात आलं की त्यांच्या एकूण कामगारांपैकी २% लोकं हे एच्.आय्.व्ही. संसर्गीत होते. व्यवस्थापनाने याच्या आर्थिक पैलुचा विचार केला यामध्ये उत्पादनात घट, वैद्यकीय खर्च, आयुर्विमा, बदली कामगार इ. त्यांच्या असंही लक्षात आलं की जर कामगारांना औषधोपचार केले नाहीत तर आजाराच्या पुढच्या १० वर्षाच्या टप्प्यात २१ दशलक्ष युएस् डॉलर्स खर्च करावे लागतील. याउलट जर कामगारांना एआरटी पुरवली तर त्यांच्या आयुष्यात वाढ होईल, ते स्वतःच्या कुटुंबाला आधार देऊ शकतील व या सर्वाला २.०४ युएस् डॉलर्सच खर्च येईल. या आणि अशा इतर निष्कर्षांवर प्रतिसाद म्हणून कंपनीने वेगवेगळे उपक्रम शासन, कामगार संघटना, स्वयंसेवा संस्था यांच्या मदतीने एच्.आय्.व्ही. संसर्गीत कामगारांना उपचार व आधार देण्यासाठी सुरु केले.

— आईएलओ, 2005

काळामध्ये या वयोगटात होणारे मृत्यू एकूण मृत्युदराच्या २०% होते ते आता ६० टक्क्यांवर गेलेले आहेत.

### गरीबी आणि असमानता

एच्.आय्.व्ही./एड्सचा सर्वाधिक परिणाम गरिब जनतेवर होत असतो. बोटस्वानामध्ये एका अंदाजानुसार पुढील १० वर्षात प्रत्येक कमावत्या व्यक्तीवर एका अतिरीक्त व्यक्तीचा भार येणार आहे. तर युएनएड्सच्या २००६ च्या एच्.आय्.व्ही./एड्स संदर्भातील अहवालानुसार गरीब वर्गातील याच देशातील प्रत्येक कुटुंबांवर आठ लोकांचा भार असेल. भारतामध्ये केलेल्या अहवालानुसार गरीब व कमी शिकलेले अकुशल तसच घरातील महिलांवर या संसर्गामुळे सर्वाधिक बोजा पडणार आहे.

### कलंक व भेदाभेद

कलंक व भेदाभेद हे या साथीचे दोन सर्वात भयानक परिणाम आहेत. एच्.आय्.व्ही. चा प्रतिबंध व संसर्गीत व्यक्तींना औषधोपचार यामध्येही हे दोन सर्वात मोठे अडसर आहेत. एच्.आय्.व्ही. संसर्गाबद्दल असलेली संसर्गाची भावना ही संसर्गीत किंवा ज्यावर संशय आहे संसर्गाचा अशा व्यक्तीच्या बाबतीत नकाराची भुमिका तयार करते. यामध्ये एच्.आय्.व्ही./एड्स मुळे मृत्युमुखी पावलेल्या व्यक्तींची मुलं असतील, किंवा एच्.आय्.व्ही./एड्स संसर्गीत व्यक्तींच्या कुटुंबातील इतर सदस्य असतील. युएन एड्सच्या या व्यक्तींप्रती होणाऱ्या भेदभावाच्या मापदंडानुसार अशा लोकांचं जुलमी पद्धतीने समाजापासून दूर ठेवणं हे भेदाभेदाच्या तत्वात मोडतं. एच्.आय्.व्ही./एड्स संसर्गीत व्यक्तींना विशिष्ट ठिकाणी येऊ न देणं हे ही याच प्रकारचं वर्तन ठरतं. ही समस्या सर्वत्रच आहे. फक्त त्या त्या देश प्रदेशातील संस्कृतीनुसार अंतर आढळते.

### आरोग्य संवर्धन

एच्.आय्.व्ही. हा एक महागडा विषाणू. ज्या देशांमध्ये या विषाणूचा संसर्ग आहे त्या देशातील आरोग्य सेवांवर याचा विपरीत परिणाम झालेला आहे. हा परीणाम वेगवेगळ्या पद्धतीने झालेला आहे. प्राथमिक पातळीवर उत्पादक वर्ग कमी होत असल्यामुळे करदाते कमी होतात. उलट असलेल्या आरोग्य सेवांवर आणखी भार पडू लागतो. आफ्रिकेतील सहारा भागात एच्.आय्.व्ही. संसर्गीत विविध रोगाच्या रुग्णांनी रुग्णालयातील अर्ध्याहून जास्त खाटा भरल्या आहेत.

## राज्यकारभार – महत्वाचा घटक

### निर्णायक भुमिका

एच्.आय्.व्ही./एड्स साथीचा प्रसार आणि चांगल्या प्रतीचा राज्यकारभार यांच्यात काय संबंध आहे या प्रश्नाचा आपण थोडा विचार करुया.





प्रथमदर्शनी या दोघांमध्ये काही संबंध असेल असं वाटत नाही. पण तज्ञ व राज्यशास्त्रातील धुरंधर याच्या मते या दोन गोष्टी अतिशय जवळून संबंधित आहेत. चांगल्या राज्यकारभाराचा एच्.आय्.व्ही./एड्स ची साथ थांबवण्यास निश्चितच उपयोग होतो याउलट निकृष्ट प्रकारच्या राज्यकाराभाराने संसर्ग वाढत जातो आणि मृत्यूदर हा आपल्या नियंत्रणात राहू शकत नाही.

दाता राष्ट्रे आणि संस्था या अधिकाधिक चांगल्या राज्यकारभारावर भर देत असून राज्यकारभार असही म्हटलं तर अयोग्य ठरणार नाही.

एच्.आय्.व्ही./एड्स ज्या प्रमाणात समाजामध्ये विध्वसं घडवून आणत आहे ते बघता चांगल्या राज्यकारभाराची गरज अधिकच अधोरेखित होते. ढिसाळ पद्धतीने जर आरोग्य विषयक व्यवस्थापन असलं तर या साथीशी सामना देऊ शकणार नाहीच परंतु उध्वस्त समाज थांबलेला विकास आणि कमी सरासरी आयुष्यमान या सर्वांना आपल्याला तोंड द्यावं लागेल. अनेक आफ्रिकी देशांकडे




islamicate.typepad.com

त्याची निधीच्या उपलब्धतेशी सांगड घालत आहे. एका दृष्टीने बघीतलं तर निधीचा योग्य वापर आणि त्याचा अधिकाधिक फायदा संबंधितांना व्हावा हा त्यामागचा हेतू आहे.

## एच्.आय्.व्ही./एड्स व राज्यकारभारतील संबंध

कमी होणारे आयुष्यमान, विकास व सामाजिक समस्या या पार्श्वभुमीवर चांगला राज्यकारभार महत्वाचा ठरतो. कार्यक्षमतेने व सुनियोजित पाऊल उचलुन एड्स चा फैलाव रोखता येतो हे थायलंड व युगांडा यांनी दाखवून दिले आहे. ग्लोबल गव्हर्नन्स १९९५ च्या अहवालानुसार व्यक्ती आणि संस्था मग त्या सार्वजनिक असतील अथवा खाजगी ज्या पद्धतीने त्यांचे कारभार चालवतात त्याचा एकत्रित विचार केला तर राज्यकारभाराची आपल्याला कल्पना येऊ शकते. सार्वजनिक बाबींचे कार्यक्षम व्यवस्थापन म्हणजेच चांगला

आपल्याला वाईट व्यवस्थापनेचे उत्तम उदाहरण म्हणून बघांवं लागेल, याउलट थायलंड व युगांडा सारख्या देशांनी उत्तम व्यवस्थापनाच्या माध्यमातुन या साथीचा कसा अटकाव होऊ शकतो याचंही उत्तम उदाहरण जगापुढे ठेवलेलं आहे.

लिनाहुसू या युएनडीपीच्या अधिकाऱ्यानुसार एच्.आय्.व्ही./एड्स वर विजय मिळवण्याचे सूत्र खालीलप्रमाणे आहे.

विकास + कार्यक्षम राज्यकारभार = फैलाव रोखण्याचा मंत्र

हे सूत्र सिद्ध होईल अशी उदाहरणं अनेक समाजांमध्ये आपल्याला दिसतात. जरी या सुत्रामध्ये सामाजिक व सांस्कृतिक फरक गृहित धरले नसले तरीही या सुत्राची अंमलबजावणी झालेली उदाहरणं उदंड आहेत.

जे शासन लोकांच्या आर्थिक विकासाकडे व उत्पन्न वाढीकडे काळजीपूर्व लक्ष देते ते शासन अप्रत्यक्षपणे नागरीकांना त्या धोक्यांपासून दूर नेते जे निकृष्ट आर्थिक परिस्थितीतल नागरीक स्विकारण्यास तयार होतात.

उदाहरणच घ्यायचं झालं तर ग्रामिण भागातील स्थलांतरित होणारे कामगार ज्यांच्या अंगी केवळ कृषीविषयकच कौशल्ये आहेत त्यांना शहरात आल्यानंतर शरीरविक्रयापलिकडे पर्याय उरत नाही. गावात राहुनच जर का त्यांच्या अंगी विविध प्रकारच्या




कौशल्यांचा विकास केला तर शहरात आल्यावर शरीरविक्रयाचा पर्याय त्यांना अंगीकारावा लागणार नाही. जर राज्यकारभार उत्तम असेल तर अशा प्रकारच्या कौशल्यवृद्धीवर भर देऊन एच्.आय्.व्ही./एड्स पासून जनतेच्या एका मोठ्या हिश्शाला दूर ठेवता येईल.

## चांगला राज्यकारभार म्हणजे काय?

युएनडीपी च्या नुसार पारदर्शकता, सहभाग व उत्तरदायित्व हे महत्वाचे निकष आहेत. कायद्याचे राज्य हा तर गाभा आहे. राजकीय, सामाजिक आणि आर्थिक प्राथमिकता तर सर्वानुमते ठरतात, व समाजातील दुर्बल घटकांना निर्णय प्रक्रियेत सामिल करुन घेतले जाते.

चांगल्या राज्यकारभारामध्ये केवळ चांगलं शासन हे अभिप्रेत नाही तर नागरीकांचं सरकारच्या कार्याविषयी ज्ञान तसच शासनाच्या विविध संस्थांच्या व्यवस्थापनात त्यांनी रस घेणं अभिप्रेत आहे. चांगला राज्यकारभार हा समाजाच्या सर्व पातळ्यांवर अभिप्रेत आहे.

याउलट कमकुवत राज्यकारभार हा भ्रष्टाचाराची प्रतिमा उभी करतो. पारदर्शिकतेच्या व उत्तरदायित्वाच्या अभावी भ्रष्टाचार वाढत जातो व कायद्याचे राज्य समता, प्रतिसाद, दृष्टी व कार्यक्षमता या सर्वांचा त्यात बळी जातो.

## चांगल्या राज्यकारभाराचे घटक

**सहभाग** – सर्व स्त्री पुरुषांना निर्णय प्रक्रियेत स्थान हवं व त्यांच्या हितांचं प्रत्यक्ष किंवा कायदेशीर संस्थांच्या माध्यमातुन संवर्धन व्हायला हवं. असा सहभाग संघटन स्वातंत्र्य व विचार स्वातंत्र्य तसच रचनात्मक सहभागाच्या क्षमतेनेच शक्य होतो.

**कायद्याचे राज्य** – नि:पक्षपातीपणे कायद्याचा अंमल(विशेषत्वाने मानवाधिकारासंबंधातील अधिकार)

**पारदर्शकता** – पारदर्शकता ही माहितीच्या मुक्तद्वारातुन तयार होते. सर्व प्रक्रिया व संस्था या संबंधितांकरता खुल्या असून ते समजण्याचं व लक्ष ठेवण्याचं स्वातंत्र्य संबंधितांना हवं.

**प्रतिक्रियाशिल शासन** – सर्व संबंधितांना सेवा देण्याची मानसिकता

**सर्वानुमती** – चांगल्या राज्यकारभाराचा आणखी एक गुण म्हणजे वेगवेगळ्या हितसंबंधांमध्ये मध्यस्थी साधून विशिष्ट गटाच्या दृष्टीने जे हिताचं आहे त्या संदर्भात एक व्यापक सहमती बनवणं.

**न्याय** – सर्व नागरिकांना त्यांचे जीवनमान सुधारण्याची समान संधी

**परिणामकारकता व कार्यक्षमता** – विविध गरजांच्या पूर्ततेसाठी साधनांचा कार्यक्षम वापर करणाऱ्या संस्था व पद्धती

> एड्सची साथ आफ्रिकेत आज वेगाने पसरते आहे, तर तिने उत्पात माजविला आहे. या साथीपासून स्वत:ला वाचवायची संधी भारतात आपल्याला आजही आहे.
>
> — **अटलबिहारी वाजपेयी**
>
> भूतपूर्व पंतप्रधान, भारत





उत्तरदायित्व – निर्णयप्रक्रिया संचालित करणारे मग ते सरकारी, खाजगी किंवा नागरी संस्थांमधील असोत, ते अंतिमतः संबंधित लाभार्थींना उत्तरदाई आहेत.

व्यूहरचनात्मक दृष्टी – नेते व जनता यांचा चांगला राज्यकारभार व मानव विकासाचा एक दूरगामी दृष्टीकोन असतो. या मागे असलेली ऐतिहासीक, सांस्कृतिक व सामाजिक गुंतागुंत त्याना माहित असते.

या बिकट परिस्थितीतुन मार्ग काढू शकेल.

- विविध मंत्रालयातील समन्वयाच्या माध्यमातुन वेगवेगळ्या क्षेत्रांना एकत्र आणत प्रतिबंध व काळजी हे चांगल्या प्रकारे घेता येईल.

- विविध स्तरावरून प्रतिसाद (राष्ट्रीय ते गावपातळीवर) यामध्ये राष्ट्रीय, प्रादेशिक, जिल्हा व सामुदायिक पातळीवर संयुक्त प्रयत्न अपेक्षित आहेत.




## चांगल्या राज्यकारभाराचे प्रेरणादाई घटक

काही राष्ट्रांनी कार्यक्षम राज्यकारभाराच्या माध्यमातून एड्सचा प्रसार थांबवता येतो हे दाखवून दिले आहे. खालील बाबींच्या आंतर्भावामुळे हे घडू शकते असे सर्वमान्य झाले आहे.

- एच्.आय्.व्ही. चा प्रसार थांबवण्यासंदर्भात कणखर राजकीय इच्छा असेल तरच एच्.आय्.व्ही. च्या साथीशी मुकाबला करता येईल. सुयोग्य धोरणं व संसर्गाचा सामना करण्यासाठी आवश्यक तो निधी या मार्गातुन शासन

- साथीचे व जोखमीच्या वर्तणुकीचे लक्षपूर्वक अध्ययन व त्यांचा कार्यक्रम व धोरण बनवण्यावर परिणाम

- सामान्य जनता व जोखमीचे वर्तणूक असणाऱ्यांकरिता केंद्रीय कार्यक्रमामधील समन्वय

- कार्यक्रमाचा विस्तारीत पाया

- प्रतिबंध व काळजी यांचा समन्वीय कार्यक्रम